# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र. मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/D १८८७९ दिनांक :- 04 DEC 2020

## कार्यालयीन आदेश

**विषय :- उद्योग विस्ताराकरीता भूखंड वाटप करण्याकरीता अवलंबवायाची कार्यपध्दती..**

**संदर्भ :- १).क्र. मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/डी०४७३३ दि. १३.०९.२०१९**
**२)क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ ए९३२६० दि. ११.०३.२०२०**

महामंडळाच्या दिनांक ११.०३.२०२० च्या परिपत्रकानुसार उद्योग विस्तारासाठी प्राधान्याने भूखंड वाटप करताना अ प्रभागात १०००० चौ.मी. व त्यावरील क्षेत्राकरीता १०० कोटी गुंतवणूक, ५००० चौ.मी. पेक्षा जास्त व १०००० चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्राकरीता ५० कोटी गुंतवणूक तसेच ५००० चौमी व त्यापेक्षा कमी क्षेत्राकरीता २५ कोटी गुंतवणूक करणे तसेच भूखंडधारकाने मूळ भूखंडावर ६० टक्के चटई निर्देशकांपेक्षा जास्त वापर केला आहे तसेच भूखंडावरील बीसीसी ६० टक्क्यापेक्षा कमी व ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे अशा उद्योजकांना प्राधान्याने भूखंड वाटप करणेबाबत धोरण निर्गमित केलेले आहे.

सदरहू परिपत्रकात "अ" प्रभागात ५००० चौ.मी. व त्याखालील क्षेत्राकरीता २५ कोटी गुंतवणूक करणे क्रमप्राप्त करण्यात आलेले आहे तथापि ५००० चौ.मी व त्यापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या भूखंडावर तेवढीच २५ कोटी गुंतवणूक करणे शक्य नाही. याबाबत विविध संघटनेकडून/उद्योजकांकडून कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर भूखंडाच्या क्षेत्रनिहाय्य गुंतवणूकीवर लवचिकता असावी याबाबत निवेदने प्राप्त झाली होती सबब कोव्हिड-१९ च्या पाश्वभूमीवर प्रकल्पांच्या पुनरुज्जीवनाबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक १६.१०.२०२० रोजी झालेल्या ३८७ व्या बैठकीत विचारार्थ सादर करण्यात येवून प्रकरणी चर्चा होवून ठराव क्र. ६१२६ पारीत करण्यात आला.

सदरहू पारीत ठराव क्र ६१२६ मधील अ.क्र. ९ नुसार महामंडळाचे परिपत्रक दिनांक ११.०३.२०२० मधील प्रभागनिहाय्य ५००० चौ.मी. आणि त्यापेक्षा कमी क्षेत्रातील गुंतवणूक आवश्यकतेनुसार क्षेत्रनिहाय सुधारित करण्याचे अधिकार मु.का.अ. यांना प्रदान करण्यात आले आहेत.

सदरहू प्रदान केलेल्या अधिकारानुसार दिनांक ११.०३.२०२० च्या परिपत्रकातील अ.क्र. १ C](अ) मध्ये क्षेत्रनिहाय्य गुंतवणूकीबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. C](अ) भूखंडधारकाने मूळ भूखंडावर ६० टक्के चटई निर्देशकांपेक्षा जास्त वापर केला आहे तसेच (ब) भूखंडावरील बीसीसी ६० टक्क्यापेक्षा कमी व ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे. सदरहू उद्योजकास त्यांच्या प्रकल्पानुसार मोकळी जागा जास्त प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. तसेच ज्या उद्योजकांची प्रस्तावित

भूखंडाचे **क्षेत्र ५,००० चौ.मी. व त्यापेक्षा कमी आहे**, अशा भूखंडांकरीता क्षेत्रनिहाय्य गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रभाग(zone) व क्षेत्र वर्गीकरण | भूखंडाचे क्षेत्र | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) (Working Capital वगळून) |
|---|---|---|---|
| १ | अ | ५००० चौ.मी. | २५ कोटी |
| | | ४००० चौ.मी. | २० कोटी |
| | | ३००० चौ.मी. | १५ कोटी |
| | | २००० चौ.मी | १० कोटी |
| | | १००० चौ.मी. | ५ कोटी |
| २ | ब | ५००० चौ.मी. | १५ कोटी |
| | | ४००० चौ.मी. | १२ कोटी |
| | | ३००० चौ.मी. | ९ कोटी |
| | | २००० चौ.मी | ६ कोटी |
| | | १००० चौ.मी. | ३ कोटी |
| ३ | क | ५००० चौ.मी. | १० कोटी |
| | | ४००० चौ.मी. | ८ कोटी |
| | | ३००० चौ.मी. | ६ कोटी |
| | | २००० चौ.मी | ४ कोटी |
| | | १००० चौ.मी. | २ कोटी |
| ४ | ड व ड+ | ५००० चौ.मी. | ५ कोटी |
| | | ४००० चौ.मी. | ४ कोटी |
| | | ३००० चौ.मी. | ३ कोटी |
| | | २००० चौ.मी | २ कोटी |
| | | १००० चौ.मी. | १ कोटी |

संदर्भिय परिपत्रक क्र. २ मध्ये इतर कोणताही बदल करणेत आलेला नाही.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी :-

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.

६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई